11:39:24 **स.क्रि.केस नं. १०१६/२०२४**

महाराष्ट्र शासन वि.श्रावण दिलीप जाधव

**निशाण नं.१४ /क**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी.**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव – भिमराव कृष्णात वारके

वय –५० वर्षे

धंदा – सध्या नेमणुक कोडोली पोलीस ठाणे.

राहणार – कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ. डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु**

१. मी कोडोली पोलीस स्टेशन येथे सन २०२४ ते आजमितीपर्यंत कार्यरत होतो. दि. १२.०७.२०२४ रोजी मी कर्तव्यावर हजर असताना आमचे वरिष्ठ श्री. कोडग साहेब यांच्या आदेशाने पो. ना. किर्तीवर्धन, पो. कॉ. पाटील, जानकर आणि मी पेट्रोलिंगकरिता वारणा सहकारी साखर कारखान्याच्या पाठीमागे असलेल्या कॅनॉल जवळ गेलो होतो. त्यावेळी अंधारामध्ये एक इसम मोबाईलचा लाईट लावलेला दिसून आला, म्हणून आम्ही त्या इसमाजवळ गेलो असता, तो इसम बिअरची बाटली समोर ठेवून आणि प्लॅस्टीकचा एक ग्लास बियरचे प्राशन करत आम्हाला दिसून आला, त्यानंतर तेथून जाणाऱ्या दोन पंचांना आम्ही पंचनामा करिता येणार का असे विचारणा केली असता त्यांनी त्यास होकार दिला. सदर दोन पंचांना घेवून आम्ही घटनास्थळी आलो, झालेली सर्व हकीकत त्यांना सांगितली तसेच त्या ठिकाणी पंचनामा करून त्या इसमास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव श्रावण दिलीप जाधव रा. बहिरेवाडी असे आम्हांस सांगितले. तसेच सदर इसमाकडे असलेली बाटली व ग्लास याची आम्ही पाहणी केली, सदर बाटली व ग्लासमधून उग्रट वास येत होता, सदर बाटली टयुबर्ग कंपनीची असून त्यात ६५० मिली. दारुपैकी १०० मिली दारू शिल्लक होती. तसेच एक प्लॅस्टीकचा ग्लास होता त्याचा उग्रट

वास येत होता. तसेच या सगळयाचा पंचनामा दोन पंचांसमक्ष पो. ना. किर्तीवर्धन यांनी केला. सदरचा इसम हा अंदाजे २५ ते ३० वर्षाचा होता तसेच तो नशेत दिसून येत होता तसेच तो दारू पिल्याचे दिसून येत होते. तसेच सदरचा मुद्देमाल आम्ही दोन पंचांसमक्ष तेथेच नाश केला. सदर इसमास घेवून आम्ही कोडोली पोलीस स्टेशन येथे आलो. सदर आरोपीविरुद्ध मी उघडयावर दारू सेवन करत असल्यामुळे फिर्याद दिली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद व प्रथमवर्दी तीच आहे. त्यावर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि. १५ व नि. १६** देण्यात येत आहे. जो इसम उघडयावर दारू पीत बसला होता व ज्याचे ताब्यात मला दारू मिळून आली त्या इसमास पाहिल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी सदर इसम न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. एस. पी. लोखंडे यांचेमार्फत सुरु,**

२. मी कोडोली पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर अंदाजे सन २०२४ पासून कार्यरत आहे. मी वारणानगर येथे राहतो. पेट्रोलिंगकरिता आम्ही रात्री अंदाजे ८ वाजता बाहेर पडलो. हे म्हणणे खरे आहे की, दि. १२.०७.२०२४ हे जुलै महिना म्हणजेच पावसाचे दिवस आहेत. त्या दिवशी पाऊस पडत नव्हता. वारणा कारखाना ते कोडोली पोलीस स्टेशन हे अंतर अंदाजे २ किमी आहे. वारणा कारखाना व कॅनॉलच्या दरम्यानचे अंतर हे अंदाजे २०० फूट एवढे आहे. कॅनॉल ते रस्ता हे अंतर अंदाजे १०० फूट आहे व रस्ता ते कारखाना हे अंतर अंदाजे १०० फूट आहे. हे म्हणणे खरे आहे की, कारखान्याच्या पाठीमागे असलेला भाग पूर्ण अंधाराचा आहे. साखर कारखानाचा राउंड भाग हा अर्धा किमीचा असून त्यातील पाठीमागील भाग हा अंधारामध्ये असतो, त्यात असलेल्या रस्त्यावर रहदारी असते. आम्ही पेट्रोलिंगकरिता आमची स्वतःची मोटरसायकल घेवून गेलो होतो. मी फिर्याद देतेवेळी आमची स्वतःची मोटरसायकल घेवून गेल्याचे नमूद केले होते. हे म्हणणे खरे आहे की, आता मला दाखविण्यात आलेल्या फिर्यादी जबाबामध्ये माझ्या गाडीचा क्रमांक कोठेही नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, कारखान्याच्या कॅनॉलच्या साईडला तुरळक झाडी झुडपे आहेत. ज्यचा ठिकाणी घटनास्थळ होते त्या ठिकाणी आम्ही पंचनामा केला होता. पंचनाम्याकरिता आम्ही पॅड, कोरे कागद, पेन व बॅटरी नेली होती. हे म्हणणे

खरे आहे की, कॅनॉलच्या शेजारी पूर्वेला कॉलेज व कॅन्टीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दरम्याने कॉलेजमधील मुले रात्री जेवल्यानंतर फिरायला बाहेर पडतात. आम्ही पेट्रोलिंगकरिता जातेवेळी पोलीस स्टेशनला अहवाल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या अंधारात कारखानाच्या कॅनॉल जवळ कोणी बसले नव्हते , केवळ आमचा कोटा पूर्ण करणेकरिता सदर आरोपी विरुद्ध मी फिर्याद दाखल केली. आम्ही आमची गाडी २०० फूट अंतरावर घटनास्थळापासून उभी केली होती. आमची गाडी घटनास्थळाच्या उत्तरेला उभी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, कॅनॉलच्या जवळ कारखान्याच्या पाठीमागे पूर्व पश्चिम असा रस्ता आहे. मी कथन करत असलेले घटनास्थळ हे पूर्व पश्चिम रस्त्याच्या दक्षिण बाजूला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याने कोणताही गुन्हा केलेला नसताना मी त्याचेविरुद्ध खोटी फिर्याद दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

11:59:25

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. २३.०३.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा